क्र.मुं.वि.मं./शाखा लेखा–१ब२/२५०५
वाशी, नवी मुंबई, ४००७०३
दिनांक:– ०६/०१/२०२२

प्रति,

मुख्याध्यापक/प्राचार्य,
मुंबई विभागीय मंडळ कार्यक्षेत्रातील,
सर्व मान्यताप्राप्त शाळा/कनिष्ठ महाविद्यालय,

यांना कळविण्यात येते की, सन २०२१–२२ च्या इ. ११ वी प्रवेशासंदर्भात राज्य मंडळामार्फत आयोजित करण्यात येणारी सामायिक प्रवेश परीक्षा (CET) शासन निर्णयानुसार रद्द करण्यात आल्याने सदर परीक्षेसाठी आवेदनपत्रे सादर केलेल्या विदयार्थ्यांचे परीक्षा शुल्क परत करण्याबाबतचे राज्य मंडळाचे प्रकटन सोबत जोडले आहे.

(डॉ. सुभाष बोरसे)
विभागीय सचिव,
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक
शिक्षण मंडळ, मुंबई विभागीय मंडळ,
वाशी,नवी मुंबई ४०० ७०३.

---

Telephone :- 27652445 , 27662504 , 27881075 , 27881077, 27899987 * Fax *:- 27659491 / 27881349
*Email * : sschsc.mumbaiboard@gmail.com * Website *: www.sscboardmumbai.in

Scanned with CamScanner

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे - ४११ ००४

## प्रकटन

शालेय शिक्षण व क्रीडा विभाग शासन निर्णय क्र.परीक्षा ०६२१/प्र.क्र.५२/एसडी-२, दिनांक २४ जून २०२१ व क्र.प्रवेश ०५२१/प्र.क्र.५२/एसडी-२, दिनांक १२ जुलै २०२१ रोजीच्या शासन पत्रामधील आदेशानुसार सन २०२१-२२ इ.११ वी प्रवेशासाठी सामायिक प्रवेश परीक्षा (सीईटी) राज्यमंडळामार्फत आयोजित करण्यात येणार होती. सदर सामायिक प्रवेश परीक्षेसाठी राज्य मंडळाव्यतिरिक्त अन्य मंडळाच्या प्रविष्ट होणा-या विद्यार्थ्यांकरिता रु. १७८/- परीक्षा शुल्क निश्चित करण्यात आले होते. राज्यमंडळाच्या संकेतस्थळावर २७५२ विद्यार्थ्यांनी आणि शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक) यांच्या इ.११ वी ऑनलाईन प्रवेशासाठी निश्चित केलेल्या संकेतस्थळावर ४१५८२ विद्यार्थ्यांची आवेदनपत्रे प्राप्त झाली.

तथापि सदर सामायिक प्रवेश परीक्षा शासन निर्णय क्रमांक परीक्षा ०६२१/प्र.क्र.५२/एसडी-२, दिनांक ११/०८/२०२१ अन्वये रद्द करण्यात आल्यामुळे सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक २२ एप्रिल २०२१ मधील तरतुदीनुसार नोंदणी शुल्काची रक्कम वजा करुन, विद्यार्थ्यांनी ज्या payment gateway द्वारे व ज्या माध्यमातून परीक्षा शुल्क जमा केले आहे त्याच मार्गाने प्रति विद्यार्थी रु. १४३/- प्रमाणे परीक्षा शुल्काचा परतावा विद्यार्थ्यांना करण्याबाबत निर्णय घेण्यात आला आहे.

तरी उपरोक्त निर्णयाच्या अनुषंगाने शिक्षक, विद्यार्थी व पालक तसेच इतर सर्व संबंधित घटकांनी याची नोंद घ्यावी.

सचिव,
राज्यमंडळ, पुणे - ४



Scanned with CamScanner